। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १०६ वा । बुधवार दिनांक ०१ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## हिमोफिलियावरील जगातील पहिल्या आयुर्वेदिक संशोधनाला यश

### धाराशिव पॅटर्न'ची देशभर चर्चा; १३० रुग्णांवरील संशोधनातून उत्साहवर्धक निष्कर्ष: मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची उपस्थिती आयुर्वेदाधारित पूरक उपचार पद्धतीने निर्माण केली नवी आशा





**धाराशिव, (जिमाका)** हिमोफिलियासारख्या दुर्मिळ अनुवांशिक रक्तस्त्राव विकारावर आयुर्वेदाच्या माध्यमातून वैज्ञानिक पद्धतीने संशोधन करणाऱ्या जगातील पहिल्या संरचित क्लिनिकल संशोधन प्रकल्पाचा यशस्वी समारोप धाराशिव येथे झाला.शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव आणि 'रक्तामृत इन हिमोफिलिया संशोधन व विकास विभाग' यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या अभिनव संशोधन प्रकल्पाच्या समारोप सोहळ्यास महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी व्हर्च्युअल माध्यमातून प्रमुख उपस्थिती दर्शविली.या संशोधनामुळे हिमोफिलिया रुग्णांसाठी आयुर्वेदाधारित पूरक उपचारपद्धतीच्या दिशेने नवी आशा निर्माण झाली असून,संशोधनातून विकसित झालेल्या धाराशिव पॅटर्न'ची आता देशभर चर्चा सुरू झाली आहे.

नुकत्याच झालेल्या समारोप सोहळ्यात महाराष्ट्रासह विविध राज्यांतील १३० हिमोफिलिया रुग्ण,वैद्यकीय तज्ज्ञ, संशोधक,सामाजिक संस्था,उद्योगसमूहांचे प्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी झाले होते.संशोधनाचे मार्गदर्शन प्रा.डॉ.एन.एस.गंगासागरे यांनी केले असून,मुख्य संशोधक डॉ.शुभम धूत यांच्या संकल्पना,नेतृत्व आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांतून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार झाला.

**हिमोफिलियासाठी आयुर्वेदाधारित पूरक उपचाराचा अभिनव प्रयोग**

हिमोफिलिया हा जन्मजात व दुर्मिळ रक्तस्त्राव विकार असून रक्त गोठविण्यासाठी आवश्यक असलेल्या क्लॉटिंग फॅक्टर्सच्या कमतरतेमुळे रुग्णांना वारंवार रक्तस्त्रावाचा सामना करावा लागतो.या आजारावर कायमस्वरूपी उपचार उपलब्ध नसून क्लॉटिंग फॅक्टर इंजेक्शन हा प्रमुख उपचार पर्याय आहे. मात्र,हा उपचार अत्यंत खर्चिक असल्याने अनेक रुग्णांना नियमित उपचार घेणे शक्य होत नाही.ही गरज ओळखून मुख्य संशोधक डॉ.शुभम धूत यांनी आयुर्वेदाच्या तत्त्वांवर आधारित 'रक्तामृत वटी' आणि 'रक्तामृत तैल'विकसित करून हिमोफिलिया रुग्णांसाठी पूरक उपचारपद्धतीवर आधारित संशोधन प्रकल्प सुरू केला.

**१३० रुग्णांवर नि:शुल्क उपचार**

४ ऑगस्ट २०२५ ते २७ जून २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील निवडलेल्या १३० हिमोफिलिया रुग्णांवर पूर्णपणे नि: शुल्क उपचार करण्यात आले.या संशोधनांतर्गत रुग्णांना एकाच छताखाली हिमोफिलिया तज्ज्ञांचे मार्गदर्शन,आयुर्वेद व आधुनिक वैद्यकीय तज्ज्ञांचे संयुक्त उपचार,Factor Assay, Inhibitor Test,PT, aPTT यांसह आवश्यक रक्त तपासण्या,रक्तामृत वटीचा औषधोपचार,आवश्यकतेनुसार Factor VIII व Factor IX इंजेक्शन, फिजिओथेरपी,व्यायाम प्रशिक्षण, Genetic Counselling,तसेच आहार,पथ्य आणि जीवनशैलीविषयक मार्गदर्शन देण्यात आले.

**संशोधनातील निष्कर्ष ठरले उत्साहवर्धक**

संशोधनाच्या प्राथमिक निष्कर्षांमध्ये अनेक सकारात्मक बदल नोंदविण्यात आले.क्लॉटिंग फॅक्टर इंजेक्शनची आवश्यकता कमी होण्यास मदत, रक्तस्त्रावाच्या घटनांमध्ये लक्षणीय घट, रक्तस्त्रावाचा कालावधी,वेदना व सूज कमी होणे, सांध्यांचे आरोग्य,हालचालींची क्षमता आणि स्नायूंच्या बळामध्ये सुधारणा, मानसिक ताण,चिंता व थकवा कमी होणे, आत्मविश्वास व स्वावलंबन वाढणे, शाळा,महाविद्यालय व नोकरीतील उपस्थितीत वाढ तसेच रुग्णांच्या ɀuality of Life मध्ये सकारात्मक सुधारणा झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले.

मुख्य संशोधक डॉ.शुभम धूत यांनी सांगितले की,हे निष्कर्ष हिमोफिलिया रुग्णांसाठी आयुर्वेदाधारित पूरक उपचारपद्धतीच्या दिशेने नवी आशा निर्माण करणारे आहेत.

**मुख्य सचिवांकडून संशोधनाचे कौतुक**

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या संशोधनाचे कौतुक करताना समाजहित, विज्ञान,संशोधन आणि संवेदनशीलतेचा संगम घडविणारा हा उपक्रम महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. हिमोफिलिया रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याची क्षमता या संशोधनात असून अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल,अशी ग्वाही त्यांनी दिली.

**लोकप्रतिनिधी आणि मान्यवरांचा पाठिंबा**

कार्यक्रमात ओमप्रकाश पवनराजे निंबाळकर आणि कैलास घाडगे-पाटील यांनी व्हर्च्युअल माध्यमातून सहभाग घेतला. लोकसभा सदस्य ओमप्रकाश पवनराजे निंबाळकर यांनी 'रक्तामृत' उपचारपद्धतीमुळे हिमोफिलिया रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल दिसत असल्याचे सांगत या संशोधनासाठी केंद्र व राज्य शासनाकडून आवश्यक ते सहकार्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

आमदार कैलास घाडगे-पाटील यांनी हा प्रकल्प धाराशिवसाठी अभिमानास्पद असल्याचे नमूद करत भविष्यात राज्यातील सर्व हिमोफिलिया रुग्णांना 'रक्तामृत' औषध विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील,असे सांगितले.आयुष संचालक डॉ.रामन घुंगराळेकर यांनी हा प्रकल्प आयुर्वेदाच्या इतिहासातील अभिमानास्पद संशोधन असल्याचे सांगून शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

**सीएसआरच्या सहकार्यामुळे संशोधनाला बळ**

क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लिमिटेडचे कृष्णकुमार बूब,काळे ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अशोक काळे,आर.एम. धारीवाल फाउंडेशनच्या शोभाताई धारीवाल यांच्यासह विविध उद्योगसमूहांनी सामाजिक बांधिलकीतून या संशोधनाला आर्थिक व नैतिक पाठबळ दिले.त्यांच्या उडठ सहकार्यामुळेच 'धाराशिव पॅटर्न' संशोधन प्रकल्प यशस्वीपणे पूर्णत्वास गेल्याचे डॉ. धूत यांनी सांगितले.

**'धाराशिव पॅटर्न' जगासाठी आरोग्याचे नवे मॉडेल**

मुख्य संशोधक डॉ.शुभम धूत म्हणाले,'धाराशिव पॅटर्न' हा केवळ वैद्यकीय संशोधन प्रकल्प नसून महाराष्ट्रातून संपूर्ण जगासाठी साकारत असलेले मानवीय,वैज्ञानिक आणि सामाजिक आरोग्य मॉडेल आहे.या मॉडेलची शासन स्तरावर व्यापक अंमलबजावणी झाल्यास हिमोफिलिया रुग्णांना किफायतशीर उपचार उपलब्ध होतील आणि महागड्या क्लॉटिंग फॅक्टर उपचारांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होईल.आमचा अंतिम उद्देश केवळ संशोधन करणे नसून हिमोफिलिया रुग्णांचे जीवन अधिक सुरक्षित, सन्मानजनक आणि गुणवत्तापूर्ण बनविणे हा आहे.

जगातील पहिल्या संरचित आयुर्वेदाधारित हिमोफिलिया संशोधन प्रकल्पाच्या यशस्वी पूर्णत्वामुळे धाराशिवने वैद्यकीय संशोधन क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख निर्माण केली असून,'धाराशिव पॅटर्न' भविष्यात देशासाठी एक महत्त्वाचे आरोग्य मॉडेल ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## क्राईम न्युज

### एक लाख वीस हजार किंमतीच्या बैलाची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी राजेंद्र काशीनाथ पाटील, वय ६० वर्षे, रा. एकोंडी वाडी ता. उमरगा जि. धाराशिव, यांचे एकोंडी वाडी शेतात बांधलेले दोन बैल एकुण १,२०,००० किंमतीचे दि. २७.०६.२०२६ रोजी ०७.०० ते दि. २८.०६.२०२६ रोजी ०५.०० वा. सु.अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- राजेंद्र पाटील यांनी दि.२८.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत बंकट दिलीप कांबळे, वय ४३ वर्षे, रा उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.२९.०६.२०२६ रोजी नाईचाकुर गावात सचिन कांबळे यांचे घरासमोर मोकळ्या जागेत अंदाजे १,५०० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर तानाजी बंकट बाचके, वय ३७ वर्षे, रा. कोरेगाववाडी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.२९.०६.२०२६ रोजी १९.२५ वा. सु. कोरेगाव ते कोरेगाववाडी जाणारे रोडलगत तानाजी बचके यांचे पानटपरी समोर अंदाजे ६०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १५ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

कळंब पोलीस ठाणेअंतर्गत संगिता रा. पाथर्डी ता. कळंब जि. धाराशिव या दि.२९.०६.२०२६ रोजी पाथर्डी येथे आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

आंबी पोलीस ठाणे: अंतर्गत नामे-विजय सुभाष कदम, वर्षे, ३० रा.कंडारी ता. परंडा जि.धाराशिव हे दि.२९.०६.२०२६ रोजी आपल्या राहत्या घराचे पाठीमागे आडोशाला अंदाजे २,२४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३२ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये आंबी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे. सर्व माहिती पोलिसाकडून मिळाली असून या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त नगर परिषद शाळेत गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप




धाराशिव (प्रतिनिधी)- छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सम्राट सेवाभावी सामाजिक संस्थेच्या वतीने नगर परिषद शाळा क्रमांक २१ व नगर परिषद शाळा क्रमांक २ धाराशिव येथे गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप करण्यात आला या उपक्रमांतर्गत दोन्ही शाळांतील एकूण ५० विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या उज्ज्वल भविष्यास हातभार लागावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय थोरात, संस्थेच्या सचिव सौ. सुप्रिया थोरात,

कार्यक्रमास नगर परिषद शाळा क्रमांक २१ च्या मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा धोत्रे, शिक्षिका श्रीमती जयश्री मिंढे, तसेच नगर परिषद शाळा क्रमांक २ च्या मुख्याध्यापिका श्रीमती मीना सुरवसे आणि संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असून, भविष्यातही अशाच समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## टीईटी पेपरफुटी प्रकरणी परीक्षा परिषद प्रमुखांवर कारवाई व शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

धाराशिव (प्रतिनिधी ) टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) पेपरफुटी प्रकरणी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या प्रमुखांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच राज्याचे शालेय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने यांनी मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठविण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिक्षणाचा हक्क (आरटीई) कायद्यानुसार शिक्षक पदासाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा शिल्लक असलेल्या कार्यरत शिक्षकांनाही टीईटी अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे लाखो भावी व कार्यरत शिक्षक या परीक्षेच्या कक्षेत आले असून, २८ जून रोजी होणाऱ्या परीक्षेसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती. मात्र, परीक्षेच्या आदल्या दिवशीच पेपर फुटीचे प्रकरण समोर आल्याने परीक्षा रद्द करण्याची वेळ प्रशासनावर आली.

या घटनेमुळे लाखो परीक्षार्थींच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले असून, राज्यातील परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमागे जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होत नसल्याने यंत्रणा बेफिकीर बनल्याची टीकाही करण्यात आली आहे.

टीईटी पेपरफुटीसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आणि शालेय शिक्षण विभाग जबाबदार असल्याचा आरोप करत, परीक्षा परिषद प्रमुखांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी आणि नैतिक जबाबदारी स्वीकारून शालेय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी शेरखाने यांनी केली आहे. दोषींवर कठोर कारवाई झाल्यास भविष्यात अशा घटनांना आळा बसेल आणि परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित होईल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

या निवेदनाच्या प्रती शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक, संबंधित लोकप्रतिनिधी तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

## त्रिमुर्ती एन्टरप्रायजेस व माउली किराणा दुकान अज्ञाताने फोडले

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अभिजीत बाळासाहेब फंड, वय ३३ वर्षे, रा. रुई ढोकी ता. जि. धाराशिव, यांचे त्रिमुर्ती एन्टरप्रायजेस व माउली किराणा दुकानाचा पाटीमागील पत्रा अज्ञात व्यक्तीने उचकटुन आत प्रवेश करुन दुकानातील तेलाचे २० डब्बे, १ लिटर तेलाचे ५ बॉक्स, शाबु ३० किलो, भगर ३० किलो, शेंगदाने ९८ किलो, विक्रम चहा २० किलो, कोलगेट कंपनीच्या ८ बॉक्स, निरमा पावडर २० बॅग २७ किलोचे, व्हिल कंपनीचे साबण ६० नग, महाभारत कंपनीचे साबण ६० नग असा एकुण १,८६,४९९ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी अभिजीत फंड यांनी दि.२८.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३४(१), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## बालविवाह करून तरुणानी तिच्यावर केला लैंगीक अत्याचार

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत १३ वर्षीय ५ महिनेची मुलगी माहे २०२४ ते दि.२८.०६.२०२६ रोजी हि अल्पवयीन आहे हे माहित असताना तिचे आई वडील व सासु सासरे यांनी एका गावातील एक तरुणाशी बालविवाह केल्याने नमुद तरुणानी तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२८.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा. न्या. सं. कलम-६४(२)(एस)६५ (१), सह कलम ४,६, ८,१२ पोक्सो सह कलम ९, १०, ११ बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# नीट-टीईटी पेपरफुटी विरोधात धाराशिव युवक व विद्यार्थी काँग्रेसचा निषेध मशाल मोर्चा




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- नीट (NEET) व टीईटी (TET) पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी धाराशिव जिल्हा युवक व विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने रविवारी (दि.२९) निषेध मशाल मोर्चा काढण्यात आला. सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणून गेला.

काँग्रेस भवन येथून सुरू झालेला मशाल मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पोहोचला. तेथे सरकारच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी करत मशाल मोर्चाची सांगता करण्यात आली.

यावेळी युवक व विद्यार्थी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नीट व टीईटी पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय व राज्यातील शिक्षण मंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. तसेच स्पर्धा परीक्षा पूर्णपणे पारदर्शक व सुरक्षित पद्धतीने घेण्यात याव्यात, दोषींवर कठोर कारवाई करून विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करावा, अशीही मागणी करण्यात आली.

वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.सरकार विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि पालकांच्या भावनांशी खेळत असून या प्रकारांमुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी युवक व विद्यार्थी काँग्रेसचा लढा यापुढेही अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या युवक व विद्यार्थी काँग्रेस च्या निषेध मशाल मोर्चास धाराशिव काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांच्यासह राजेंद्र शेरखाने,माजी जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, धनंजय राऊत, विनोद वीर, ॲड.सिराज मोगल,आप्पा शेळके खलील सय्यद,अग्निवेश शिंदे,महेबुब पटेल,ज्योती सपाटे,निलेश गायकवाड,गणेश पवार,दिलीप गारगुंड,प्रदीप सस्ते ,हरिभाऊ शेळके ,शहाजी मुंडे ,संकेत पडवळ,मिलिंद गोवर्धन, काझी जावेद अभिमान पेठे, अशोक बनसोडे भैय्या निरपळ, सरफराज काझी,प्रभाकर लोंढे,जालिंदर केंद्रे ,अप्पा निमसे ,काझी जावेद, अभिषेक बागल, मोईज सय्यद, पृथ्वीराज देशमुख अमोल कुतवळ,रोहित कसबे,संजय गजधने,हरिदास शिंदे ,भागवत पेठे ,किशोर राऊत , अकबर शेख राजुदास आडे, भूषण देशमुख, अझर पठाण,विजय मुद्दे, फुरखान शेख,सुदर्शन वाघमारे, धनाजी पाटील,सुदर्शन माने, समीर कोरबू,यांच्यासह युवक व विद्यार्थी काँग्रेस चे पदाधिकारी उपस्थित होते.

# धाराशिव नगरपालिकेत गैरप्रकाराचा 'ओपन सीक्रेट'! जनता त्रस्त, प्रशासन मात्र सुस्त, सत्ता बदलली... पण नगरपालिकेची व्यवस्था बदलली का?

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- नगरपालिकेतील भोंगळ कारभार, ठेकेदारांचे वाढते वर्चस्व, मनमानी प्रशासन आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे होणारे सातत्याने दुर्लक्ष यामुळे शहरवासीयांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. नगरपालिकेतील अनियमितता अनेक वेळा माध्यमांतून, लोकप्रतिनिधींकडून आणि नागरिकांकडून चव्हाट्यावर आली, तरीही परिस्थितीत कोणताही ठोस बदल होताना दिसत नाही.

शहरातील रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य, दिवाबत्ती, कचरा व्यवस्थापन अशा अनेक मूलभूत सेवांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांची घोषणा होते; मात्र प्रत्यक्षात अनेक कामे निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

नगरपालिकेतील काही विभागांमध्ये ठेकेदारांचा प्रभाव इतका वाढल्याची चर्चा आहे की, कोणते काम कधी करायचे आणि कसे करायचे यावरही प्रशासनाऐवजी ठेकेदारच प्रभाव टाकत असल्याचे बोलले जाते. अशा वातावरणामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून, जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे.

सत्ताधारी कोणतेही असोत, पण नगरपालिकेतील कारभारातील त्रुटी आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांचा विषय कायमच चर्चेत राहिला आहे. प्रत्येक निवडणुकीत विकासाची आश्वासने दिली जातात; मात्र नागरिकांना अपेक्षित सुविधा मिळण्यात वारंवार अडचणी येत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

करांच्या माध्यमातून लाखो रुपये जमा होतात, मग मूलभूत सुविधा दर्जेदार का मिळत नाहीत? विकासकामांवर खर्च झालेल्या निधीचा सामाजिक लेखापरीक्षण होणार का? दोषी अधिकारी किंवा संबंधितांवर जबाबदारी निश्चित होणार का?

लोकशाहीत प्रशासन हे जनतेसाठी असते, ठेकेदारांसाठी नव्हे. नगरपालिकेतील प्रत्येक काम पारदर्शक पद्धतीने झाले पाहिजे, कामांचा दर्जा तपासला गेला पाहिजे आणि नागरिकांना वेळेत सेवा मिळाली पाहिजे. अन्यथा विकास हा केवळ कागदोपत्री राहील, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# सुट्टीच्या पार्श्वभूमीवर जयंतीचा निर्णय घेण्यात आला

धाराशिव (जिमाका) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती २६ जूनऐवजी २५ जून रोजी साजरी केल्याबाबत आणि त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या वृत्तावर समाजकल्याण विभागाने खुलासा प्रसिद्ध केला आहे.

सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण, धाराशिव कार्यालयामार्फत छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन २५ व २६ जून २०२६ या दोन दिवसांत करण्यात आले होते.२६ जून रोजी मोहरमची शासकीय सुट्टी असल्यामुळे जिल्ह्यातील सर्व शाळांना सुट्टी होती.त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागाशी संबंधित उपक्रम २५ जून रोजी आयोजित करण्यात आले.या उपक्रमांमध्ये समता दिंडी रॅली,गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावरील व्याख्यान,तसेच आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ सेवनविरोधी दिनानिमित्त डॉ.संदीप तांबारे यांचे व्याख्यान यांचा समावेश होता.

त्यानंतर २६ जून २०२६ रोजी समाजकल्याण कार्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तसेच धाराशिव येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज चौकातील स्मारकस्थळी अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून,त्याची छायाचित्रेही विभागाकडून सादर करण्यात आली आहेत.

समाजकल्याण विभागाने प्रसिद्ध केलेल्या खुलाशात नमूद केले आहे की, हा निर्णय केवळ शाळांना असलेल्या सुट्टीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला होता.उलट शाहू महाराज जयंतीनिमित्त दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती अधिक व्यापक स्वरूपात साजरी करण्यात आली. त्यामुळे शासनाच्या आदेशांचे उल्लंघन झाल्याचा आरोप वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.तसेच, वस्तुस्थिती जनतेसमोर यावी या उद्देशाने सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण, धाराशिव यांनी हे स्पष्ट केले आहे.

## मोवाका चे उल्लंघन : गुन्हा दाखल

भुम पोलीस ठाण अंतर्गत रा. सोनगिरी ता. भुम जि. धाराशिव हे दि.२९.०६.२०२६ रोजी आपल्या ताब्यातील मोटरसायकल १ ही जिजाउ चौक रोडवर भुम येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

# धाराशिव बसस्थानकातील स्वच्छतेचा बोजवारा; १५ दिवसांपासून स्वच्छतागृहाला कुलूप, प्रवासी व कर्मचाऱ्यांचे प्रचंड हाल

धाराशिव(शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- धाराशिव येथील बसस्थानकातील स्वच्छतागृह (वॉशरूम) तब्बल पंधरा दिवसांपासून बंद असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. स्वच्छतागृहाला कुलूप असल्यामुळे एसटी कर्मचारी, महिला व पुरुष प्रवासी तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

स्वच्छतागृह बंद असल्याने अनेकांना उघड्यावर लघुशंकेसाठी जावे लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली असून, त्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढत असल्याचे चित्र आहे. एकीकडे स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाते, तर दुसरीकडे बसस्थानकासारख्या सार्वजनिक ठिकाणी मूलभूत सुविधा बंद असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

स्वच्छतागृह नेमके कोणत्या कारणामुळे बंद आहे? पाणीटंचाईमुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे का? अथवा देखभाल व व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष झाले आहे? याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्ट माहिती देणे आवश्यक असल्याची मागणी प्रवासी व कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

दररोज हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या बसस्थानकात स्वच्छतागृह बंद राहणे ही गंभीर बाब मानली जात असून, महिला प्रवासी, ज्येष्ठ नागरिक आणि

दिव्यांग व्यक्तींना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन स्वच्छतागृह त्वरित सुरू करावे, तसेच बंद राहण्यामागील कारणांची चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत आहे.

## मराठी शाळा वाचवा... भविष्य वाचवा!

# इंग्रजीच्या मोहापायी जिल्हा परिषद शाळा ओस पडत आहेत; आता तरी पालकांनी जागे व्हावे!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-धाराशिव जिल्ह्यात आज एक चिंताजनक चित्र पाहायला मिळत आहे. एकेकाळी गावागावातील ज्ञानमंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद मराठी शाळा विद्यार्थ्यांच्या अभावामुळे ओस पडू लागल्या आहेत. पालकांचा वाढता कल इंग्रजी माध्यमाकडे वळल्याने अनेक मराठी शाळांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ही केवळ शिक्षणाची नव्हे, तर आपल्या मातृभाषा, संस्कृती आणि ग्रामीण शिक्षण व्यवस्थेच्या अस्तित्वाची लढाई आहे.

आज प्रत्येक पालकाला वाटते की, इंग्रजी माध्यमात शिकले तरच मुलांचे भविष्य उज्ज्वल होईल. मात्र हा समज कितपत योग्य आहे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. कारण आज प्रशासन, न्यायव्यवस्था, राजकारण, साहित्य, पत्रकारिता, उद्योग, शेती, विज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात यशस्वी झालेल्या हजारो व्यक्ती मराठी शाळेतूनच घडलेल्या आहेत.

आपणही जिल्हा परिषद किंवा मराठी शाळेत शिकूनच मोठे झालो. त्या शाळेतील शिक्षकांनी आपल्याला घडवले. आपण आपल्या मुलांसाठी मात्र त्या शाळेकडे पाठ फिरवत आहोत. हा विरोधाभास थांबविण्याची गरज आहे.

**शासनाच्या कोट्यवधींच्या योजना; पण विद्यार्थीच नाहीत!**

जिल्हा परिषद शाळांमध्ये मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन, डिजिटल शिक्षण, संगणक, क्रीडा साहित्य, प्रशिक्षित शिक्षक, गुणवत्तापूर्ण शिक्षण अशा अनेक सुविधा उपलब्ध आहेत. तरीदेखील पालकांचा विश्वास कमी होत असल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटत असून काही शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर आहेत.

**मराठी शाळा बंद म्हणजे गावाचा आत्माच हरवेल**

मराठी शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नाही, तर गावाच्या संस्कृतीचे केंद्र आहे. शाळा बंद झाली की गावातील मुलांचे बालपण, संस्कार, मातृभाषेचे जतन आणि सामाजिक बांधिलकी यावर परिणाम होतो. त्यामुळे ही केवळ शिक्षणाची बाब नसून समाजाच्या भविष्याचा प्रश्न आहे.

**पालकांनो, आजच निर्धार करा!**

आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्यायचेच आहे, पण त्यासाठी मराठी शाळा कमी आहेत असा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. इंग्रजी ही भाषा शिकावी; पण मातृभाषेचा त्याग करून नव्हे. मजबूत पाया मराठीतूनच तयार होतो. त्यावर इंग्रजीचे ज्ञान सहज उभे राहू शकते.

प्रत्येक पालकाने एक संकल्प करावा- आपल्या गावातील जिल्हा परिषद मराठी शाळा वाचवायची, आपल्या मुलांना मातृभाषेच्या शाळेत प्रवेश द्यायचा आणि मराठी शिक्षणाचा अभिमान बाळगायचा.

मराठी शाळा टिकल्या तरच मराठी भाषा टिकेल, संस्कृती टिकेल आणि आपल्या गावाचा आत्मा जिवंत राहील. अन्यथा उद्याची पिढी आपल्यालाच प्रश्न विचारेल- ज्या शाळेने तुम्हाला घडवले, ती शाळा वाचवण्यासाठी तुम्ही काय केले?

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# नाईकनगर (मु.) येथील जि. प. शाळेत ५१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



मुरूम (प्रतिनिधी)- येथील परिसरातील नाईकनगर (मु) तांडा वस्तीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना बसव प्रतिष्ठान अखिल भारतीय सामाजिक संघटनेचे वतीने अध्यक्ष डॉ.रामलिंग पुराणे यांच्या हस्ते ५१ गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे दि. ३० वार मंगळवार रोजी वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुख्यध्यापक श्रीमती वंदना जाधव, तानाजी बिराजदार, सविता साळुंखे, संगीता राठोड, आबाराव कांबळे आदींची उपस्थिती होती. मुरूम शहर व त्याचबरोबर परिसरातील जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप कार्यक्रम उपक्रम राबवण्याचा मानस असून समाजाने दिलेली देणगी समाजापर्यंत पोहचावे यासाठी प्रयत्न करत असल्याचे मत डॉ. पुराणे यांनी मांडले.

# ट्रॉली बॅग मधील रोख रक्कम ६६,५००, कपडे व बॅग असे एकुण १,०५,५०० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरला

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गम फिर्यादी सद्दीश स्टॅनली फ्रांन्सीस, वय ४६ वर्षे, रा. १५२ मेकोसा बाग, ख्रिश्चन कॉलनी कडबी चौक नागपुर हे दि.२८.०६.२०२६ रोजी धुळे ते सोलापुर हायवे ण्नण्च ५२ रोडवरती वाशी फाटा ते घुले माळ प्रवास दरम्यान फोर्स अरबेनीया (ब्रदर्स टुर्स आणि ट्रॅव्हल्स) गाडी क्र एम. पी. ०९ एपी २९७० वर कॅरेजवर बांधलेल्या ट्रॉली बॅग मधील रोख रक्कम ६६,५००, कपडे व बॅग असे एकुण १,०५,५०० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सद्दीश स्टॅनली फ्रांन्सीस यांनी दि.२८.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# २८१ कारवाया करुन २,७२,८०० 'तडजोड शुल्क' वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२८जुन रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २८१ कारवाया करुन २,७२,८०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649